# वास्तविकतेचे रंग

दिलीप फडके

राजहंस प्रकाशन

*ईशान, इयन आणि दानी यांच्यासाठी*

*या कादंबरीतील सर्व पात्रे आणि प्रसंग काल्पनिक आहेत. त्यांचा कुठल्याही जीवित अथवा मृत व्यक्तीशी किंवा घटनेशी संबंध वाटल्यास तो केवळ योगायोग समजावा. या पुस्तकाद्वारे समाजातील कुठल्याही घटकाला दुखवायचा लेखकाचा उद्देश नाही.*

## मनोगत

वैद्यकीय आणि इतर क्षेत्रांत अनेक वर्षे काम केल्यामुळे माझा समाजातील विविध स्तरांतील लोकांशी संबंध आला. वेळोवेळी त्यांच्याबरोबर होत असलेल्या बोलण्यातून काही गोष्टी मला प्रकर्षाने जाणवल्या. आपण सर्वच जण कित्येक पूर्वग्रह उराशी बाळगतो, अनावश्यक धारणांना मनात स्थान देतो. आपण आपल्या मतांचा आधार काय हे तपासून बघत नाही. त्याचबरोबर सहजतेने लोकांचे, त्यांच्या वागण्याचे वर्गीकरण करायलाही आपण कचरत नाही. हे पूर्वग्रह बाळगण्याशी शिक्षणाचा, वयाचा किंवा श्रीमंतीचा संबंध नाही. सुशिक्षित आणि श्रीमंत लोकांच्या मनातील पूर्वग्रह, अनावश्यक धारणा, वास्तवावर आधारित नसलेली मते; हे सगळे मी खूप वेळा प्रत्यक्ष अनुभवले आहे. कदाचित या अनुभवांमुळेच मी ही कादंबरी लिहायला प्रेरित झालो.

या पुस्तकातील मुख्य पात्रांना आदर्श तरुण-तरुणी म्हणता येणार नाही. तरी समाजातील अनेक युवक-युवतींचे विचार त्यांच्यासारखे असावेत, अशी इच्छा जरूर आहे.

मी या लिखाणातून समाजातील कुठल्या एका घटकाचे प्रश्न मांडल्याचा दावा करत नाही. तसेच कुठल्याही एका घटकावर टीका करण्याचा हा प्रयत्न नाही. माझ्या लेखनाने लोकांना आनंद मिळावा, ही प्राथमिकता ठेवून मी ही कादंबरी लिहिली आहे. मात्र कधीतरी यातील एखाद्या वाक्याने, प्रसंगाने वाचकाला त्या गोष्टीवर विचार करायला उद्युक्त केले; तर मी माझ्या प्रयत्नात यशस्वी झालो असे समजेन.

हे पुस्तक लिहिताना धनवंती हर्डीकर यांनी अनेक सकारात्मक सूचना दिल्या आणि त्यांच्याशी वेळोवेळी केलेली चर्चा कादंबरीला आकार देण्यात बहुमूल्य ठरली. ही कादंबरी लिहायला माझी पत्नी अंजली हिने मला खूप प्रोत्साहन दिले.

'राजहंस प्रकाशना'सारख्या प्रसिद्ध आणि नावाजलेल्या संस्थेने

माझे मराठीतील पहिले पुस्तक प्रकाशनासाठी निवडले, याचा मला खूप आनंद आहे. यासाठी 'राजहंस'चे सर्वेसर्वा दिलीप माजगावकर यांचे मी आभार मानतो. संपादक विनया खडपेकर यांनी कादंबरीला अंतिम स्वरूप देण्यात महत्त्वाचे योगदान दिले आणि त्याबद्दल मी त्यांचाही मन:पूर्वक आभारी आहे.

या पुस्तकाचे देखणे मुखपृष्ठ ख्यातनाम चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी साकारले. त्यांचे आभार!

'राजहंस'चे डॉ. सदानंद बोरसे, निर्मितिप्रमुख शिरीष शेवाळकर, अक्षरजुळणीकार यशोधन लोवलेकर, मुद्रितशोधक अंजली नावडीकर, तृप्ती देशपांडे, वैशाली जोशी, सारिका भामे, शर्मिली जोशी, संजय जोशी, भरत मोतीवाले आणि संपूर्ण 'राजहंसी' टीमचेही आभार. ही कादंबरी प्रकाशित करण्यासाठी ज्या ज्या लोकांनी हातभार लावला, त्या सर्वांना धन्यवाद देतो.

**दिलीप फडके**

# एक

सामान्यत: मनाला पटणारे विचार कृतीत न आणण्यासाठी स्वत:ची मानसिक कमकुवतता सोडून जगाच्या पाठीवरची इतर कुठलीही गोष्ट कारणीभूत ठरवली जाऊ शकते. रोहनच्या मनात राजीनामा देण्याचे विचार बरेच महिने घोळत असतानाही पुढे काय करायला आवडेल; हे कळत नसल्याची सबब त्याने स्वत:ला दिली होती.

आज ऑफिसला जाताना त्याने सिग्नलला गाडी थांबवली, तेव्हा चार-पाच मुले पुस्तकांचे गठ्ठे हातात घेऊन पुढच्या काही गाड्यांकडे धावताना दिसली. ते जवळजवळ रोजचेच दृश्य होते. कुठल्या गाडीजवळ किती वेळ थांबायचे, कोण पुस्तक विकत घ्यायची शक्यता आहे, कुठल्या वेळी विक्रीची संभावना जास्त असते; ह्या सगळ्या गोष्टी ती मुले अनुभवाने शिकत असणार यात शंका नव्हती. अचानक नवीन ॲड कँपेनचे स्वरूप ठरवण्यासाठी स्ट्रॅटेजी मीटिंग असल्याचे आठवले. मार्केटिंग मॅनेजर, स्ट्रॅटेजी, प्लॅनिंग, ॲड कँपेन हे केवळ कानाला गोड वाटणारे शब्द होते. खऱ्या अर्थाने आपल्या कामाचे स्वरूप पुस्तके विकणाऱ्या मुलांपेक्षा वेगळे आहे का, असा विचार त्याच्या मनात आला. ऑफिसमध्ये पोहोचेपर्यंत तोच विचार घोळत होता.

सत्तावीसाव्या वर्षी नोकरी लागली, तेव्हा रोहनला वार्षिक साठ लाखांच्या पॅकेजचे आकर्षण वाटले होते. त्याचे अप्रूप होते. नंतर केवळ 'ग्लोबल क्रिएशन्स'चे साबण आणि इतर उत्पादने विकण्यासाठी स्वत:चे शिक्षण वापरत आहोत, याची जाणीव त्याला त्रास देऊ लागली होती. आयआयटी, एमबीए आणि नंतर एखाद्या बहुदेशीय कंपनीत नोकरी हा सर्वमान्य मार्ग रोहननेही स्वीकारला होता. एक-दोन वर्षांतच रोहन कोण, त्याची खरी ओळख काय, त्याच्या शिक्षणाचा फायदा काय, तो साबण विकण्यातच जन्म घालवणार होता का; असे अनेक प्रश्न स्वत:ला विचारू लागला होता.

‘टॉवर ३६०’ला पोहोचल्यावर गाडी चार्जिंगला लावून तो ऑफिसकडे चालू लागला. वरळी येथील दर्शनी भागाला पूर्ण काचा असलेल्या या ख्यातनाम इमारतीत बाराव्या मजल्यावर ग्लोबल क्रिएशन्सचे ऑफिस होते. त्या इमारतीत अनेक बहुदेशीय कंपन्या, विदेशी बँका आणि मोठ्या वित्तीय संस्था यांची ऑफिसेस होती. आपले आयडी कार्ड दाखवून रोहनने सिक्युरिटी पार केली आणि जलद गतीच्या लिफ्टने ऑफिसमध्ये पोहोचला.

केबिनमध्ये टेबलापाशी बसल्यावर रोहनने दिल्लीच्या हेड ऑफिसने कॉंप्युटरवर पाठवलेली मेल वाचली. जो निर्णय घ्यायला तो इतके महिने कचरत होता, तो आता सोपा झाला होता.

आज कंपनीने त्वचा गोरी करण्याचे क्रीम विकायची जबाबदारी त्याच्यावर टाकली होती. कंपनी तसे क्रीम बाजारात आणणार आहे, हे रोहनला माहीत होते; तरी सामाजिक दबावाखाली कंपनी असे प्रॉडक्ट बाजारात आणू शकणार नाही, असे त्याला वाटले होते. निदान त्याने तशी आशा केली होती. कंपनीने गोरे होण्याचे क्रीम न म्हणता त्याला ‘वंडर ग्लो’ असे नाव दिले होते, मात्र जाहिरात करताना अर्धा चेहरा सावळा आणि क्रीम वापरल्यानंतरचा अर्धा चेहरा गोरा ठेवायची सूचनाही दिली होती.

रोहनने कॉंप्युटरवर राजीनामा टाइप केला आणि बन्सल यांच्या केबिनमध्ये जाऊन त्यांच्या हातात ठेवला.

‘‘रोहन, काय झालं, अचानक राजीनामा?’’ बन्सलनी विचारले. रोहनने सातत्याने उत्तम कामगिरी केली होती. विक्रीत गेली पाच वर्षे चांगली वाढ झाल्याने मुंबई ऑफिसचे मुख्य ह्या नात्याने त्यांना त्याचे श्रेय घेता आले होते.

‘‘ऑनेस्टली, मला असं गोरं होण्याचं क्रीम विकता येणार नाही. ते बरोबर नाही. नुसतं नाव वंडर ग्लो आहे.’’

‘‘इतकंच?’’ बन्सलनी विचारले, ‘‘हे काही कारण नाही. दुनियेला हेच पाहिजे आहे. त्यात काही लीगल प्रॉब्लेमदेखील येणार नाही.’’

‘‘असेल, पण माझ्या दृष्टीने हे खूप मोठं कारण आहे. आपण चुकीचा मेसेज देतोय, चुकीची ॲटिट्यूड प्रमोट करतोय. लीगॅलिटीचा प्रश्न नाही.’’

‘‘गोरी स्कीन कुणाला आवडत नाही?’’

‘‘फक्त गोरा रंग चांगला हे सुचवतोय, विच इज रॉंग. हे स्टिरिओ टायपिंग आहे.’’

# चार

रोहनने दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये जाऊन पेंडिंग कामे संपवण्यावर लक्ष केंद्रित केले. दिवसभर कामात व्यग्र राहिला. कधी कोणी सहकारी येऊन त्याच्याशी सल्लामसलत करत होते. ज्यांना राजीनाम्याची बातमी काल कळली नव्हती, असे अकाउंट विभागातील एक-दोन लोकदेखील केबिनमध्ये येऊन भेटून गेले. संध्याकाळी निघायच्या आधी सई त्याच्या केबिनमध्ये आली, तेव्हा त्याच्या लक्षात आले की, तो कामाच्या गडबडीत तिची चौकशी करायला साफ विसरला होता.

''तुमच्याशी काही बोलायचं आहे.'' सई म्हणाली.

''बरं आहे ना? तुझा चेहरा ठीक दिसत नाही, कालपण तसंच वाटलं. तुला विचारणारच होतो. काही टेन्शन आहे का?'' रोहनने विचारले. सई त्याच्या हाताखाली चार वर्षे काम करत होती. ऑफिसमधील सई एकच अशी सहकारी होती की, जिच्याविषयी रोहनचे मत एकदम चांगले होते. तो डोळे झाकून तिच्यावर जबाबदारी टाकू शकत होता, एखादे महत्त्वाचे काम सोपवू शकत होता. तिला इतके टेन्स त्याने आधी कधी बघितले नव्हते.

''नाही, मी ठीक आहे, पण काही बोलायचं आहे. यानंतर तुम्ही किती वेळा ऑफिसमध्ये याल याची खात्री नाही.'' ती नर्व्हस दिसत होती.

सईला काय प्रॉब्लेम आहे, हे त्याला कळत नव्हते. तिने मुंबईच्या एका नावाजलेल्या इन्स्टिटयूटमधून एमबीए केल्याचे आठवत होते. तिचा पगार चांगला होता, त्यामुळे आर्थिक अडचण असेल असे वाटत नव्हते. तिच्या घरच्या परिस्थितीविषयी मात्र त्याला काहीच माहीत नव्हते.

''खरंय, परत कधी येईन ते माहीत नाही, पण तू आत्ता बोलू शकतेस.'' रोहन म्हणाला.

ती थोडी विचारात पडली. मनात काहीतरी निर्णय घेत होती.

''आपण बाहेर कुठे भेटू शकू का? थोडं वैयक्तिक आणि महत्त्वाचं आहे. प्लीज.''

खरे तर एका मुलीला बाहेर भेटणे ही अतिशय सामान्य गोष्ट होती; पण रोहनने बरोबर काम करत असलेल्या मुलींबरोबर कामाव्यतिरिक्त बोलायचे, भेटायचे कटाक्षाने टाळले होते. तसे असले, तरी त्याला सईचा चेहरा खूप गंभीर वाटला. नेहमीची सहजता, प्रसन्न हास्य चेहऱ्यावर दिसत नव्हते. तिचे बोलके डोळे काही आर्जवीत आहेत, असे त्याला वाटले. प्रथमच सईने त्याला काहीतरी विनंती केली होती आणि तिचे मन मोडावेसे वाटले नाही. शिवाय त्या वेळी आयुष्यातून ग्लोबल क्रिएशन्सचा अध्याय संपल्याने त्याने ऑफिसमध्ये स्वत:वर घातलेली बंधने पाळण्याची गरज उरली नव्हती.

''ओके, इथे जवळपास एक चांगला कॅफे आहे, आपण तिथे जाऊ.'' रोहन म्हणाला.

''थँक्स.'' सईचा चेहरा थोडासा खुलला. ती आपल्या टेबलापाशी गेली आणि पर्स घेऊन लगेचच रोहनच्या केबिनमध्ये परत आली. ते दोघे न बोलता खाली उतरून रोहनच्या गाडीशी गेले. रोहनला आपले वागणे सयुक्तिक आहे का असे क्षणभर वाटले, पण त्याने तो विचार बाजूला सारला. पाच मिनिटांवर असलेल्या 'माय ओन प्लेस' या कॅफेकडे गाडी घेतली. जाताना रोहन सईविषयी विचार करत होता. ती केवळ कामात चांगली नव्हती, तर सरळ आणि मनात काही न ठेवणारी होती. त्याला कंपनीचे एक वार्षिक डिनर आठवले. शिक्षण, टॅलेंट, जातपात इत्यादींवर बोलणे झाले होते.

''आता शहरात तरी जातपात राहिली नाही.'' विनोद म्हणाला होता.

''मुंबईसारख्या एखाद्या शहरात कमी असेल, तरी राहिली नाही असं अजिबातच म्हणता येणार नाही. हल्लीच मेडिकल कॉलेजमध्ये काय झालं आठवतं ना? एका डॉक्टरनं तथाकथित उच्च जातीच्या कलीग्जच्या जाचाला कंटाळून गळफास लावून आत्महत्या केली. त्या डॉक्टरांची नावंही लिहून ठेवली होती आणि त्यामुळे त्यांना अटकपण झाली.'' सई म्हणाली होती.

''मुंबईत कुठली आलीय जातपात. मला त्या कलीग्जबद्दल सहानुभूती आहे, त्यांची करियर बरबाद झाली.'' विनोदने तिचे बोलणे उडवून लावले होते.

''तुला जी गळफास लावून मेली, तिच्याविषयी सहानुभूती नाही का? एक आयुष्य नष्ट झालं, त्याचं दु:ख नाही का? का शेड्यूल्ड कास्ट होती, म्हणून तिचं आयुष्य महत्त्वाचं वाटलं नाही? हाच माइंड सेट बदलायला पाहिजे.'' सईने म्हटले होते.

# आठ

शनिवारी थर्टी फर्स्टच्या दिवशी सकाळी रोहन सईला घेऊन बीकेसीच्या एका प्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये गेला. त्या रात्री रोहनला निखिलच्या घरी पार्टीला जायचे होते. त्याने सईला विचारले होते, पण त्यांना एकत्र येऊन एकच आठवडा झाला होता, त्यामुळे तिला इतक्या लगेच त्याच्याबरोबर सगळ्या लोकांत उघडपणे जाणे कंफर्टेबल वाटले नव्हते.

दोघांनीही शनिवार येण्याची वाट बघितली होती. मधले सगळे दिवस दोघे माय ओन प्लेसमध्ये सईचे ऑफिस संपल्यावर भेटले होते. ऑफिसमध्ये काम जास्त असल्याचे निमित्त सांगून तिथे ती एखादा तासच बसू शकत होती. शनिवारी परत पूर्ण दिवस एकमेकांबरोबर घालवता येणार होता.

सई आज जीन्सवर रेड कलरचा टॉप घालून आली होती. तिने आदल्या दिवशी जाऊन फेशियलही केले होते. थोडा मेक अप केला होता आणि माफक हिल्सच्या चप्पल घातल्या होत्या.

''तू आज स्टनिंग दिसतेयस. आधी तुला असं बघितलं नव्हतं.''

''मला बिचारीला तुला थोडी तरी शोभली पाहिजे म्हणून प्रयत्न करायला लागतात.'' ती हसून म्हणाली.

''आता यू आर फिशिंग फॉर कॉम्प्लिमेंट्स.'' तोही हसत म्हणाला.

बीकेसीतील रेस्टॉरंट भरलेले होते, पाच-दहा मिनिटांत जागा मिळणार होती. त्यामुळे ते रेस्टॉरंटबाहेर उभे राहून बीकेसी निर्माण व्हायला कधी सुरुवात झाली हे बोलत होते. गेल्या दहा-वीस वर्षांत त्या भागात खूप बदल घडला होता. अतिशय पॉश ऑफिस बिल्डिंग्ज, मॉल्स, गार्डन्स, रेस्टॉरंट्स हे सगळे त्यांच्या डोळ्यांदेखत निर्माण झाले होते.

''ही एक वेगळी दुनिया झालीये.'' रोहन म्हणाला.

''खरंय. इथे इतकी प्लॅन्ड डेव्हलपमेंट झाली, त्या मानानं झाडं कमी लावली गेली. रात्री लाइट्समुळे हा भाग सुंदर दिसतो, पण दिवसा रखरखाट

वाटतो.''

तो पुढे काही बोलायच्या आधी, एक गोरीपान, बॉबकट केलेली सुंदर मुलगी त्यांच्या जवळ आली आणि सईला म्हणाली, ''एक्सक्यूज मी, पण तू सई कांबळे ना?''

सईने होकारदर्शक मान हालवली, पण तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले नव्हते.

''मी दिव्या सेठ, आपण एका वर्गात होतो.''

''लक्षात आहे.'' सई म्हणाली. दिव्या! तिने सईजवळ बसण्यास नकार दिला होता आणि जागा बदलून मागितली होती. पण ती वेगळ्या कारणासाठी दिव्याला विसरू शकत नव्हती. पहिला नंबर मिळवण्यासाठी दिव्या खूप प्रयत्न करायची, पण सईने तसे होऊ दिले नव्हते; त्यामुळे दिव्याच्या मनात सईविषयी नाखुशी आणि आकस होता असे सईला वाटायचे.

''अ न बि ली व्हे ब ल,'' ती शब्दावर जोर देऊन म्हणाली, ''तुझ्यात इतका बदल झालाय तरी मी ओळखलं. तुला विसरणं शक्य नव्हतं, म्हणजे तू टॉपरपण होतीस. विश्वास बसत नव्हता, म्हणून तुला विचारून खात्री करावीशी वाटली.''

''टॉपर म्हणून लक्षात असेन, तर चांगली गोष्ट आहे. तुझ्यातही खूप बदल झालाय.'' सई काहीशा निरुत्साहाने म्हणाली.

''सध्या काय करतेस?''

''ग्लोबल क्रिएशन्सच्या मार्केटिंगमध्ये आहे.''

''मी आता डॉक्टर आहे, गायनॅकॉलॉजिस्ट आहे. एनी वे, मला तुझा नंबर दे, वर्गाच्या ग्रुपमध्ये ॲड करते.''

''ग्रुपवर नको. मी शक्यतोवर कुठल्या ग्रुपला जॉइन होत नाही.'' सई जरी अनेक ग्रुप्समध्ये होती, तरी शाळेच्या ग्रुपमध्ये जाण्याची तिची इच्छा नव्हती.

''ठीक आहे, तुला कंफर्टेबल असेल तसं. पण तुझ्याबरोबर एक सेल्फी घेते. कुणाचा विश्वास बसणार नाही.''

तिने सईबरोबर सेल्फी घेतली आणि 'कीप इन टच' असे म्हणून निघून गेली.

ती गेल्यावर सई म्हणाली, ''तिला माझा चेहरा लक्षात राहणारच, आता फोटो ग्रुपवर टाकून खूप कॉमेंट्स करतील.'' सईच्या चेहऱ्यावर नेहमीचे स्मित नव्हते.

# सतरा

ऑफिसमध्ये रोहनची आज महत्त्वाची मीटिंग होती. राजस्थानमध्ये सुरू केलेल्या प्रकल्पाच्या संदर्भात 'ग्रीन ईगल' या एनजीओतर्फे देखरेख करण्यास नियुक्त केलेले कुणीतरी भेटायला येणार होते. त्या मीटिंगच्या तयारीत तो गुंतून गेला. तीन वाजता तो कॉन्फरन्स रूममध्ये गेला, तेव्हा तिथे अतिशय सुंदर दिसणारी साधारण त्याच्याच वयाची मुलगी बसली होती.

''हाय, मी पल्लवी व्यास. ग्रीन ईगलतर्फे.''

''रोहन जोशी.'' तिचा हात हातात घेऊन रोहन म्हणाला.

तेवढ्यात त्याचे डायरेक्टरदेखील आले.

''तुम्ही दोघांनी एकमेकांची ओळख करून घेतली असेलच. पल्लवी आधी मुंबईत राहत होती. मराठी अस्खलित बोलते, माझ्याइतकं नसेल कदाचित,'' अय्यर हसून म्हणाले. मग सगळे मीटिंगमध्ये मग्न झाले. प्रकल्पाद्वारे जी ऊर्जा निर्माण होणार होती, ती कुठल्या खेड्यात पोहोचवता येईल, कुठे सगळ्यात जास्त गरज आहे, त्याच्यासाठी काय इन्फ्रास्ट्रक्चर लागेल; इत्यादी विषयांवर बोलणे झाले. पल्लवीच्या शिक्षणाविषयी त्याला माहीत नव्हते, पण ती अतिशय सहजपणे आणि आत्मविश्वासाने सगळ्या विषयांवर मते मांडत होती. तिने सुचवलेल्या दोन गोष्टींवर विचार करणे रोहनला जरुरीचे वाटले. दुसऱ्या दिवशी त्यावर अधिक चर्चा करायचे ठरले.

मीटिंग संपल्यावर टेबलवरून उठून ते चहासाठी सोफ्यावर बसले. रोहनने तिच्याकडे परत बघितले. ती कुणाचेही लक्ष सहज वेधून घेईल इतकी सुंदर होती. गोरा रंग, रेखीव बांधा, सरळ नाक, नाजूक जिवणी, खांद्यापर्यंत मोकळे सोडलेले केस आणि सुंदर कॉटनची साडी; सगळेच तिला शोभून दिसत होते. एक घड्याळ सोडून तिने कानांत, गळ्यात किंवा हातात काहीच घातले नव्हते.

बोलताना रोहनला तिच्याविषयी बरीच माहिती कळली. पल्लवी 'झेवियर्स'मधून अर्थशास्त्र घेऊन ग्रॅज्युएट झाली होती. मग 'कोलंबिया

महाविद्यालया'तून मास्टर्सची डिग्री घेतली होती. 'हार्वर्ड'ला पीएचडी केली होती. त्यानंतर काही काळ WHOसाठी सल्लागार म्हणून काम करत होती. सध्या ती ग्रीन ईगलची या प्रकल्पासाठी सल्लागार होती. पूर्वी आईवडील कुलाब्याला राहत होते, पण दोघांचा अपघाती मृत्यू झाला होता आणि तिने ते घर ठेवले नव्हते. ती दोन दिवसांसाठी एअरपोर्टजवळच्या 'हयात'मध्ये उतरली होती.

''तू रात्री तिला डिनरला घेऊन जा. मला आज जमणार नाही. आपण तिची काळजी घेतली पाहिजे.'' अय्यर म्हणाले.

''त्याची गरज नाही.'' पल्लवी म्हणाली.

''नाही नाही, ते काही चालणार नाही. आय इनसिस्ट, एवढं तर आपण नक्कीच केलं पाहिजे, रोहन.'' डायरेक्टर म्हणाले.

रोहनला रात्री सईला भेटायचे होते, तिच्या सह्या घ्यायच्या होत्या. उद्या वकिलाकडे नोटीससाठी कागदपत्र सोपवायची होती. पण त्याचा नाइलाज होता. रोहन पल्लवीला सातच्या सुमारास हॉटेलमधून पिकअप करेल, असे ठरले. त्याने मीटिंग संपल्यावर सईला फोन केला आणि परिस्थितीची कल्पना दिली. तिचे ऑफिस संपल्यावर दोघांनी नेहमीच्या जागी भेटायचे ठरले.

रोहन पाचच्या सुमारास, नेहमीपेक्षा जरा लवकरच निघाला. तरी शिवाजी पार्कपर्यंत यायलाच साडेपाच वाजले होते. सातला परत हयातमध्ये पोहोचायलाच पाहिजे होते. कपडे बदलायलाही वेळ मिळणार नव्हता. त्याने परत सईला फोन करून शिवाजी पार्कजवळील स्टारबक्समध्ये बोलावले. तो घरी गेला आणि पटकन एक शॉवर घेऊन नवीन कपडे घालून स्टारबक्समध्ये पोहोचला. सई आलेली होती. तिच्या सह्या घेतल्यावर ती म्हणाली, ''सकाळी काय झालं, ते सविस्तर सांग.''

''आत्ता बिलकूल वेळ नाही, पण विशेष नाही आणि मी काही वेडंवाकडं बोललो नाही, खरं तर जास्त बोललोच नाही. आपल्या दृष्टीने काही महत्त्वाचं नव्हतं. ते सगळं सावकाश सांगीन. सातला हयातला काही करून पोहोचायचे आहे. पल्लवीला वेळ दिला आहे.''

''दिसायला कशी आहे?''

''फिल्म स्टारला तोंडात मारेल. स्टनिंग.'' तो हसून म्हणाला.

''दोघंच आहात का अजून कोणी बरोबर आहे?''

''दोघंच, एका रोमँटिक कँडल लाईट डिनरला घेऊन जाणार आहे.'' तो थट्टेत म्हणाला.

# एकतीस

आज रोहन जाऊन दोन आठवडे झाले असले, तरी सई स्वत:ला पूर्ण सावरू शकली नव्हती. केबिनमध्ये बसली असताना रोहन बरोबरचे बोलणे आठवत होती. आपण परत काही चूक तर केली नाही ना, ही शंका तिला त्रास देत होती. ती त्याच विचारात गढली असताना केबिनचे दार धाडकन उघडून प्रधानसरांचा मुलगा अभी आत आला. तिच्यापेक्षा तो वयाने आठ-दहा वर्षांनी मोठा होता.

''दोन मिनिटं देऊ शकाल का मॅडम?'' त्याने विचारले.

''बसा ना. चहा मागवते.'' सई शांतपणे म्हणाली. कधीतरी तिला प्रधानसरांना आणि अभीला सामोरे जावे लागणार होते, हे ती जाणून होती.

''चहा नको. तुम्ही वयानं इतक्या लहान आहात, हे माहीत नव्हतं.'' तो तिच्याकडे बघून म्हणाला.

''काय काम होतं?''

''तुम्ही एजन्सी बदलण्याचा निर्णय का घेतलात? अचानक असं कसं करू शकता? आधी माझ्याशी बोलायची गरजदेखील वाटली नाही तुम्हाला.'' अभीच्या चेहऱ्यावर चीड होती.

''मी तुमचा राग समजू शकते, पण जे कंपनीच्या हिताचं होतं तेच केलं. आधी भेटून काहीच साध्य झालं नसतं. आय ॲम सॉरी.''

''सॉरी? त्यानं काय होणार? जे नुकसान व्हायचं, ते झालंच आहे. खरं म्हणजे आधी मी फेरविचार करा, म्हणून विनंती करायला येणार होतो. पण तुम्ही कोण आहात हे कळल्यावर तसं करायची इच्छा राहिली नाही. केवळ या सगळ्याला कोण जबाबदार हे बघायचं होतं.''

''काही काम नसेल, तर मला हे संभाषण चालू ठेवण्यात स्वारस्य नाही.'' सई म्हणाली.

अभीने जोराने खुर्ची मागे ढकलली आणि तो उभा राहिला.

''जे ऐकलं, ते खरंय. खरेबाईंनी तुमच्यासारखीला उगाचच डोक्यावर

बसवलंय. तुम्हाला आपल्या वागण्याचा पश्चाताप करावा लागेल.'' असे म्हणून तो दाराबाहेर निघून गेला.

जयंत जोशींनी केलेल्या अपमानानंतर प्रथमच कोणी तिच्या जातीचा अप्रत्यक्ष उल्लेख करून तिला कमी लेखले होते. मुंबई असो किंवा इतर जागा असो, तथाकथित उच्च जातीच्या लोकांना तिचे यश, तिची प्रगती सहन होणार नव्हती, हे तिला कळून चुकले होते. तरीदेखील या थराला जाऊन बोलायला त्यांच्या मनात किती घृणा, किती आकस असेल; हे जाणवले. वर्षानुवर्षे परत परत ठसवल्या गेलेल्या गोष्टी त्यांना सुसंगत, तर्कनिष्ठ विचार करू देणार नव्हत्या, हे स्पष्ट झाले होते.

जयंत जोशी बोलले, तेव्हा खूप लागले होते; संताप आला होता. आज तिला राग येण्यापेक्षा अभीची कीव आली. निर्णयाच्या मेरीटवर बोलण्यासारखे काही नसल्याने त्याने स्वत:ची भडास बाहेर काढली होती. तो एक प्रकारचा स्वत:च्या नाकर्तेपणाचा, क्षमता नसल्याचा कबुलीजबाब होता. एजन्सी बदलण्याच्या निर्णयाबद्दल मनात जे थोडे-फार सलत होते, ते आता पूर्णपणे नाहीसे झाले होते.

तिला झालेले संभाषण खरेबाईंच्या कानावर घालावे का, असा प्रश्न पडला होता. तिने तसे न करण्याचा निर्णय घेतला. जरी तो जाताना धमकी देऊन गेला होता, तरी अभीसारखे लोक फक्त बोलू शकतात; असे तिला वाटत होते, आणि तो तिच्यासाठी खरेबाईंशी वैर नक्कीच पत्करणार नव्हता. नवीन काही झाले, तरच जे घडले, ते खरेबाईंच्या कानावर घालणे सयुक्तिक झाले असते.

पुढचे काही दिवस ती कामात गुंतून गेली. ऑरगॅनिक खाद्यपदार्थांचा वेगळा भाग सुरू करायचा निर्णय तिने खरेबाईंच्या सहमतीने घेतला होता. त्यासाठी बाजूच्या काही शेतकऱ्यांशी बोलून त्यांना ऑरगॅनिक फार्मिंगची माहिती दिली होती. पुढच्या पावसाळ्यात तशी शेती काही स्वतंत्र भागात करायला ते तयार झाले होते. त्यांची एक मीटिंग आज ठेवली होती.

ती गजाकाकांना घेऊन त्या मीटिंगसाठी शेतकरी संघटनेच्या ऑफिसमध्ये गेली. शेतकऱ्यांशी बोलण्यासाठी, त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यासाठी; तिने जवळच्या ॲग्रीकल्चर कॉलेजच्या नावाजलेल्या प्राध्यापकांची मदत घेतली होती. उत्पादन जरी थोडे कमी

# तेहतीस

पल्लवीची भारतातील चालू असलेली कामे पूर्ण झाली होती. राजस्थानमधील प्रोजेक्ट यशस्वी झाला होता. अपेक्षेनुसार ऊर्जा उत्पादनास सुरुवात झाली होती. यापुढे त्यात तिची भूमिका उरली नव्हती. बिहारचा प्रोजेक्ट सरकारी परवाने आणि नियमांत रखडला होता, कधी सुरू होईल याची शाश्वती नव्हती. त्यात फंडिंग मंजूर करून घेण्याखेरीज तिला विशेष काम नव्हते. त्रिकाल इंजिनीयरिंगबरोबर मुंबईत मीटिंग झाल्यावर ती परत न्यूयॉर्कला जाणार होती. मार्थाला भेटून वर्ष होऊन गेले होते. या वेळी मार्थाने तिला ओळखावे, अशी तिची मनोमन इच्छा होती.

रोहनच्या मागच्या भेटीनंतर त्याला परत न भेटायचा निर्णय तिने घेतला होता. तो आता त्रिकाल इंजिनीयरिंगमध्ये नसल्याने त्याच्याशी संपर्क राहिला नव्हता. पुढे त्या दोघांत काही होण्याचा प्रश्न नव्हता, तरीदेखील परत जायच्या आधी त्याची एकदा भेट घ्यावी, असे तिला प्रकर्षाने वाटत होते. पल्लवीने त्याला 'मी न्यूयॉर्कला परत जात आहे, जायच्या आधी एकदा भेटायला आवडेल' असा मेसेज केला. रोहनने भेटायला लगेचच तयारी दर्शवली.

ते हॉटेलच्याच कॉफी शॉपमध्ये भेटले. पल्लवीला त्याचा चेहरा थोडा ओढल्यासारखा वाटला.

''तब्येत ठीक आहे ना रोहन? यू लुक टायर्ड.''

''मी ठीक आहे. कामात गुंतलो होतो.''

''सध्या काय करतोस?''

''पुण्याजवळ एक प्रोजेक्ट चालू होता, त्यातून आत्ताच बाहेर आलोय, प्रदूषण कमी करण्याचं उपकरण बनवत होतो. प्रोजेक्ट अपेक्षेपेक्षा लवकर संपला, म्हणजे आता मला तिथे सगळा वेळ राहायची गरज नाही.''

''चांगली गोष्ट आहे, पुढे काय करायचंय? काही ठरलं का?''

''नाही, अजूनही विचार केला नाही.''

''सई कशी आहे?''

''ती सध्या दापोलीला काम करतेय.''

''म्हणजे अजूनही तुम्ही एकत्र आला नाहीत?''

''दुर्दैवानं नाही.''

''अजूनही प्रॉब्लेम आहे का? डाऊट आहे का?''

''आम्ही शुअर आहोत, पण परिस्थिती चमत्कारिक झालीये. मला दापोलीला जाऊन राहावं लागेल. मला हे जमेल याची खात्री नाही.''

''त्यात काय कठीण आहे? आत्ता म्हणालास, की प्रोजेक्टसाठी बाहेर राहिलो.''

''ती वेगळी गोष्ट आहे, तिथे पर्मनंट राहणार नाही हे माहीत होते.''

''आर यू शुअर, धिस इज द ओनली रीझन?''

''आय थिंक सो.''

''रोहन, तुला काय झालंय? हे काय कारण झालं?''

''ही छोटी गोष्ट नाही. मला खरंच माहीत नाही, की तिथे राहू शकेन का, तिथे मला नोकरी कशी मिळेल, काय काम मिळेल, सगळंच अनिश्चित आहे. सईला तिथे एक एनजीओ चालू करायचाय; मला त्यात कितपत इंटरेस्ट आहे हेही माहीत नाही.''

''स्वत:च्या कंफर्ट झोनमध्ये राहण्यासाठी तू सईला सोडायला कसा तयार होऊ शकतोस? सईला झाल्या प्रकारानंतर तुझी गरज असणार, यात शंका नाही. तू इतका हार्टलेस कसा होऊ शकतोस? एड्रियन गेल्यावर माझी काय दशा झाली होती, हे मी सांगूपण शकत नाही. तुझ्या वागणुकीला मी एक प्रकारची इमोशनल क्रुएल्टी म्हणेन.''

रोहन थोडा खजील झाला. इतक्या स्पष्टपणे असा आरोप त्याच्यावर कोणी केला नव्हता.

''मी यावर काय बोलू हे कळत नाही, तरी दापोलीला सेटल होणं हा सोपा निर्णय नाही.'' तो म्हणाला.

''कदाचित नसेलदेखील. तिथे आनंदात राहशील का नाही, हे माहीत नाही; पण जर सईवर प्रेम असेल, तर सईवाचून नक्कीच आनंदात राहणार नाहीस. ती बरोबर असणं हे प्रथम पाहिलं पाहिजेस, इतर सगळ्या गोष्टी दुय्यम!''

''मान्य आहे, तरी ते कठीण आहे.''

''वेगळ्या अँगलनं बघ. हे ब्लेसिंग इन डिसगाईज आहे. तू सगळं